चंद्रपूर व नागपूर जिल्हयातील ८९ गावांमध्ये प्रकाशयोजनेसाठी एल. ई. डी. पथदिवे राबविण्याबाबतच्या पथदर्शी प्रकल्पास निधी वितरित करण्याबाबत.....

महाराष्ट्र शासन
उदयोग,ऊर्जा व कामगार विभाग,
शासन शुध्दीपत्रक क्र.बीयुडी-२०१८/प्र. क्र. २६४/ऊर्जा-७
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २८ मार्च, २०१९

वाचा : १) शासन परिपत्रक वित्त विभाग क्र. अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दि. १८ एप्रिल, २०१७
२) शासन परिपत्रक वित्त विभाग क्र. अर्थसं-२०१७/प्र.क्र.९४/अर्थ-३, दि. ३० जून, २०१७
३) शासन निर्णय क्र. बीयुडी-२०१८/प्र.क्र.२६४/ऊर्जा-७, दि. ३० ऑक्टोबर, २०१८.
४) शासन निर्णय क्र. बीयुडी-२०१८/प्र.क्र.२६४/ऊर्जा-७, दि. ३० नोव्हेंबर, २०१८.
५) महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण, पुणे यांचेकडील प्रस्ताव क्र.लेखा/बीपी-००६/ एन.आर. एस.ई. /१८-१९/५०९१, दिनांक १३ डिसेंबर, २०१८
६) शासन परिपत्रक वित्त विभाग क्र: अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३, दि. २५ जानेवारी, २०१९.
७) शासन परिपत्रक वित्त विभाग क्रमांक: अर्थसं-२०१९/प्र.क्र.४१/अर्थ-३, दि. ०८ मार्च, २०१९.
८) शासन परिपत्रक वित्त विभाग क्रमांक: अर्थसं-२०१९/प्र.क्र.४२/अर्थ-३, दि. ०८ मार्च, २०१९.

प्रस्तावना:-

महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (महाऊर्जा), पुणे यांना सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाकरिता चंद्रपुर व नागपूर जिल्ह्यातील ८९ गावांमध्ये एल.ई.डी. पथदिवे व हायमास्ट बसविण्याबाबत रु. ५०.११ कोटींच्या पथदर्शी प्रकल्पास उपरोक्त संदर्भाधीन क्र.३ येथील शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून यासाठी पुरवणी मागणीद्वारे रुपये ५३.२५६ कोटी तरतूद अर्थसंकल्पित करण्यात आली आहे. त्यानुषंगाने महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण, पुणे यांचेकडील उपरोक्त संदर्भ क्र. ५ येथील प्रस्तावान्वये रु. ५०.११ कोटी इतक्या निधी वितरणाची मागणी केलेली आहे, तथापि वित्त विभागाने रुपये २०.०० कोटी निधी वितरणास दिलेली सहमती विचारात घेऊन रुपये २०.०० कोटी निधी वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

शासन निर्णय:-

सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाकरिता चंद्रपुर व नागपूर जिल्ह्यातील ८९ गावांमध्ये एल.ई.डी. पथदिवे व हायमास्ट बसविण्याबाबतच्या पथदर्शी प्रकल्पाच्या अंमलबजावणीकरिता महासंचालक, महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण, पुणे यांना रुपये २०.०० कोटी (रुपये वीस कोटी फक्त) इतका निधी वितरित करण्यास शासनाची मंजुरी देण्यात येत आहे.

२. सदर रक्कम अदा करण्यासाठी श्री. उ.द.वाळूंज, सह सचिव (ऊर्जा), उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई यांना नियंत्रक अधिकारी व श्री. ना.रा.ढाणे, अवर सचिव, उद्योग ऊर्जा व कामगार विभाग मंत्रालय, मुंबई यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

३. सदर निधी महासंचालक, महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण, पुणे (Director General, Maharashtra Energy Development Agency, Pune) यांच्या नावे अदा करण्यात यावा.

४. अपारंपरिक ऊर्जा साधने अंतर्गत विविध योजनेवरील खर्चाचा, उद्दिष्टे व प्रत्यक्ष साध्यता याबाबतच्या माहितीसह मासिक व त्रैमासिक अहवाल लगतच्या महिन्याच्या १० तारखेपर्यंत सादर करण्यात यावा.

५. या शासन निर्णयान्वये मंजुर करण्यात आलेल्या निधीची रक्कम केवळ उपरोक्त संदर्भाधीन क्र. ३ मध्ये नमूद गावांतील प्रकल्पांकरिता सन २०१८-१९ या आर्थिक वर्षासाठी खर्च करण्यात येईल याची खातरजमा करण्याची सर्वस्वी जबाबदारी सहाय्यक संचालक (लेखा), महाऊर्जा यांची राहील.

६. सदर निधीच्या लेख्यासंबंधीची कागदपत्रे, महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरणाने आवश्यक तेव्हा महालेखापाल, महाराष्ट्र-१ मुंबई यांच्याकडे तपासणीसाठी सादर करावीत.

७. याबाबतचा खर्च " मागणी क्रमांक के-६, २८१० अपारंपरिक ऊर्जा साधने, ६० इतर, ८०० इतर खर्च, (००)(०१) महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (कार्यक्रम) (२८१० ००३४), ३१ सहायक अनुदाने (वेतनेतर)" या लेखाशीर्षाखाली सन २०१८-१९ या आर्थिक वर्षासाठी मंजूर असलेल्या तरतूदीतून भागविण्यात यावा.

८. महाराष्ट्र विनियोजन विधेयक, २०१८ शासन परिपत्रक वित्त विभाग, क्रमांक: अर्थसं-२०१८ /प्र.क्र.६९ / अर्थ-३, दि. ०२ एप्रिल, २०१८ च्या परिशिष्टातील तपासणी सूचीमधील अ.क्र. ३ व ९ येथील अटींची व या परिपत्रकातील परिच्छेद क्र.७ मधील प्रत्येक अटीची पूर्तता होत असून, शासन परिपत्रक वित्त विभाग क्रमांक: अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९ /अर्थ-३, दि. २५ जानेवारी, २०१९ मधील सूचनांनुसार अर्थसंकल्पित तरतूदीच्या मर्यादेत विभागाला प्राप्त अधिकारात सदर शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे..

९. या लेखाशीर्षाखाली निधी वितरीत करण्यासाठी सादर करण्यात आलेल्या देयकाच्या अनुषंगाने प्रमाणित करण्यात येते की, या लेखाशीर्षाखाली कोणतेही संक्षीप्त देयक प्रलंबित नाही तसेच उपयोगिता प्रमाणपत्र प्रलंबित नाही. सदर शासन निर्णय, नियोजन विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्र.२६१/१४६१, दिनांक १०.०१.२०१९ तसेच वित्त विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्र. १०/१९/व्यय-१६, दिनांक १९.०३.२०१९ अन्वये प्राप्त सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

१०. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक क्र. २०१९०३२८१६१६५६४११० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by Nanasaheb Rajaram Dhane
Date: 2019.03.28 16:20:34 +05'30'

(ना. रा. ढाणे)

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. महालेखापाल (लेखापरीक्षा), महाराष्ट्र-१, मुंबई,
२. महालेखापाल (लेखापरिक्षा), महाराष्ट्र-२, नागपूर,
३ महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१ मुंबई,
४. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-२, नागपूर,
५. अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय,मुंबई-४०० ०३२,
६. प्रधान सचिव (नियोजन), नियोजन विभाग, मंत्रालय,मुंबई-४०० ०३२,
७. प्रधान सचिव (ऊर्जा), उदयोग,ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय,मुंबई-४०० ०३२,
८. जिल्हाधिकारी, नागपूर,
९. जिल्हाधिकारी, चंद्रपूर,
१०.अधिदान व लेखा अधिकारी-रालेवि / अराप ,१.मुंबई ,
११. मा.मंत्री (ऊर्जा, नवीन व नवीकरणीय ऊर्जा) यांचे खाजगी सचिव,
१२. मा.राज्यमंत्री (नवीन व नवीकरणीय ऊर्जा) यांचे खाजगी सचिव,
१३.महासंचालक, महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण, म्हाडा कमर्शियल कॉम्प्लेक्स, त्रिदलनगर समोर, येरवडा, पुणे-४११ ००६,
१४.प्रधान सचिव (ऊर्जा) यांचे स्वीय सहाय्यक,
१५.सह सचिव (ऊर्जा) यांचे स्वीय सहाय्यक,
१६.उप सचिव (ऊर्जा-३) यांचे स्वीय सहाय्यक,
१७.निवड नस्ती (ऊर्जा-७)